दाखल दिनांक - ०४.०१.२०१०
नोंदणी दिनांक - ०४.०१.२०१०
निकाल दिनांक - ०३.०५.२०१९
कालावधी - वर्षे महिने दिवस
०९ ०३ ३०

**विटा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, विटा**
**यांचे न्यायालयांत तालुका – खानापूर, जिल्हा – सांगली,**
( पीठासीन अधिकारी वि.सा.शिंदे )

**नियमित फौजदारी खटला क्रं.०३/२०१०** निशाणी क्रं.

**महाराष्ट्र शासनातर्फे**
**विटा पोलीस स्टेशन, विटा,**
ता.खानापूर, जि.सांगली. .... **अभियोग पक्ष**

**// विरुध्द //**

१. **आनंदा गणपती अडके,**
वय वर्षे २३, व्यवसाय - मजुरी,

२. **विकास आनंदा बाबर,**
वय वर्षे २१, व्यवसाय – शेती,

४. **धनाजी श्रीरंग घाडगे,**
वय वर्षे २५, व्यवसाय - शेती,
आरोपी क्र. १,२ व ४ राहणार - जोंधळखिंडी,
ता.खानापूर, जि.सांगली. .... **आरोपी**

**दोषारोप -** भारतीय दंड विधान संहिता कलम ४५४, ३८० सह कलम ३४ प्रमाणे

व्ही.ए.पाटील – सहाय्यक सरकारी अभियोक्ता – अभियोग पक्षातर्फे
श्री. के. बी. मदने – विधिज्ञ – आरोपी क्रं.१ तर्फे
श्री. एस. ए. तांबोळी – विधिज्ञ – आरोपी क्रं.२ तर्फे
श्री. एस. जी. घोरपडे – विधिज्ञ – आरोपी क्रं.४ तर्फे

## *न्या य नि र्ण य*

( घोषित दिनांक ०३ मे २०१९ )

**१.** प्रस्तुत आरोपी १,२ व ४ यांचेविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ४५४, ३८० सह कलम ३४ प्रमाणे संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**२.** **अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

दि.०४/०९/२००९ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०४.३० चे सुमारास मौजे वाळुज येथील वर्दीदार शिवाजी लक्ष्मण बाबर यांचे राहते बंद घराचे कुलूपाची दुसरी चावी यातील आरोपी क्रं.२ याने स्वतःचे ताब्यात ठेवून घेवून, आरोपी क्रं.१, ३ व ४ यांचेशी संगनमत करुन वर्दीदार राहत असलेल्या बंद दरवाजाचे कुलूप चावीने उघडून, आत प्रवेश करुन, तिजोरीमधील सोन्या चांदीचे दागिणे व रोख रक्कम चोरी करुन मुद्दाम लबाडीने घेवून विरार, जि.ठाणे या ठिकाणी यातील आरोपी क्रं.३ याचे रुमवर आरोपी क्रं.१ ते ४ असे एकत्रीत बसून आरोपी क्रं.४ याने सोन्याची चैन ठेवून घेवून सदरचे चोरी करुन आणलेले सोना–चांदीचे दागिणे हे सांताक्रुज इस्ट मुंबई या ठिकाणी यातील साक्षीदार प्रमोद भालचंद्र शिंत्रे यांचे आटणी दुकानात गाळून सोन्याची लगड व चांदीचा पाटला तयार करुन घेवून आपसात वाटून घेतले म्हणून आरोपी क्रं.१ ते ४ यांनी भारतीय दंड विधान संहिता कलम ४५४, ३८० सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे.

**३.** वर्दी दाखल झालेनंतर ठाणे अंमलदार यांनी गु.र.नं.११३/२००९ हा ए.टी.पोळ, सहा.पोलीस फौजदार विटा पोलीस स्टेशन यांचेकडे अधिक तपासासाठी दिला. तपासी अधिकारी यांनी तपासटिपणी व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले.

त्यानंतर आरोपींनी वर्दीदारचे घरी अनाधिकारपणे प्रवेश करुन फिर्यादीचे मालकीचे सोने–चांदीचे दागिणे वर्दीदारचे संमती शिवाय चोरुन नेल्याचे तपासात निष्पन्न झालेने आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. सदर प्रकरणी आरोपी क्र. १,२ व ४ न्यायालयात हजर झाले असता भारतीय दंड संहिता कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधाबाबत आरोप निश्चिती केली. उक्त दोषारोप आरोपींना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी सदर दोषारोप अमान्य करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची समर्थता दर्शविली. याकामी आरोपी क्र. ३ हा हजर झाला परंतु केस चालू असताना तो गैरहजर राहिला त्यामुळे आरोपी क्र. १, २ व ४ यांच्याविरुध्द सदरची केस वेगळी करुन चालविण्यात आली आहे.

५. सदर प्रकरणी आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबानी नोंदविण्यांत आली. आरोपींचा बचाव असा की, त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही. सदर प्रकरणी त्यांना निष्कारण गोवण्यात आलेले आहे. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.ए.पाटील व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. के. बी. मदने, श्री. एस. ए. तांबोळी, श्री. एस. जी. घोरपडे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत प्रकरणात आरोपींच्या दोषसिध्दीसाठी पुढील मुद्दे निष्कर्ष विवेंचनार्थ निर्माण झाले. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणांसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| *अ.क्रं.* | *विचाराधीन बाबी* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | आरोपी क्रं.१ ते ४ यांनी संगनमत करुन दि.०४/०९/२००९ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०४.३० चे दरम्यान मौजे वाळुज येथील वर्दीदार शिवाजी लक्ष्मण बाबर यांच्या घरात चोरटे गृह अतिक्रमण किंवा घरफोडी केली म्हणून आरोपींनी भारतीय दंड विधान संहिता कलम ४५४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | नकारार्थी. |
| २. | वर नमुद तारीख, वेळेस व ठिकाणी आरोपी क्रं.१ ते ४ यांनी | नकारार्थी. |

संगनमत करुन वर्दीदार यांचे घरातून सोने–चांदीचे दागिणे व रोख रक्कम वर्दीदारचे संमती शिवाय लबाडीने चोरुन नेऊन भारतीय दंड विधान संहिता कलम ३८० सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का ?

३. आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे

## <u>का र ण मि मां सा</u>

**६.** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द तोहमत असलेले गुन्ह्याच्या शाबितीकरिता खालीलप्रमाणे सात साक्षीदार तपासलेले आहेत. वर्दीदार श्री.शिवाजी लक्ष्मण बाबर (साक्षीदार क्रं.१) याची साक्ष नि.१११ कडे, घटनास्थळ पंच साक्षीदार श्री.कुंडलिक खाशाबा बाबर (साक्षीदार क्रं.२) याची साक्ष नि.११५ कडे, निवेदन व जप्ती पंच साक्षीदार श्री.मनसुर बालेखान शेख (साक्षीदार क्रं.३) याची साक्ष नि.१२६ कडे, निवेदन व जप्ती पंच साक्षीदार श्री.दस्तगीर नबीलाल शिकलगार (साक्षीदार क्रं.४) याची साक्ष नि.१३१ कडे, निवेदन व जप्ती पंच साक्षीदार श्री.सुनिल बाळकृष्ण कांबळे (साक्षीदार क्रं.५) याची साक्ष नि.१३८ कडे, श्री. प्रमोद भालचंद्र शिंत्रे (साक्षीदार क्रं.६) याची साक्ष नि.१४२ कडे, तर तपासी अधिकारी श्री.अशोक तुकाराम पोळ (साक्षीदार क्रं.७) याची साक्ष नि.१४४ कडे, तसेच वर्दी नि. ११२ कडे, घटनास्थळ पंचनामा नि.११६ कडे, तपासाचा लेखी आदेश नि.१४५ कडे, मुद्देमाल पावती नि.१४६,१४७,१४८ कडे, आरोपी आनंदा आडके याचा निवेदन व जप्ती पंचनामा नि.१३९ कडे दाखल केलेले आहे.

### <u>विचाराधीन बाबी क्रं.१ व २ बाबत –</u>

**७.** वरील दोन्ही मुद्दे एकमेकांशी सुसंगत असलेने पुनरावृत्ती टाळणेसाठी एकत्रीत विचारार्थ घेणेत आले. सरकार पक्षाच्या वतीने तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचे जाब जबाब काळजीपुर्वक पडताळून पाहिले असता असे दिसून येते की, वर्दीदार शिवाजी बाबर (सा.क्रं.१) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता चोरीची

घटना सन २००९ साली त्यांच्या घरी वाळूज येथे घडली असून त्यांच्या घरातील ५० ग्रॅम सोन्याची बोरमाळ, ५० ग्रॅम सोन्याचे गंठण, ३० ग्रॅम सोन्याची एक चैन व २० ग्रॅम सोन्याची एक चैन, सोन्याचे ब्रेसलेट, अजून एक सोन्याची बोरमाळ, कानातील सोन्याची फुले, ८ ग्रॅम सोन्याची चैन, पायातील चांदीचे पैजण ६०० ग्रॅमचे, त्याचप्रमाणे रोख रक्कम १५,०००/– ची चोरी झाल्यामुळे त्यांनी अज्ञात इसमांविरुध्द नि.११२ अन्वये वर्दी दिली असल्याचे त्यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितल्याचे दिसून येते.

८. वर्दीदार श्री.बाबर (सा.क्रं.१) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी वर्दी नि.११२ प्रमाणे साक्ष दिली असल्याचे दिसून येते. वर्दीदार याच्या पुराव्यावर अविश्वास ठेवावा असे काहीही बचाव पक्षाने उलटतपासाव्दारे न्यायालयीन अभिलेखावर आणले नाही. त्यामुळे वर्दीदार श्री.बाबर (सा.क्रं.१) यांचा पुरावा विश्वास संपादन करतो. वर्दीदार श्री.बाबर (सा.क्रं.१) सांगतात त्याप्रमाणे त्यांच्या घरातील सोन्या–चांदीच्या दागिन्यांची व रोख रकमेची चोरी झाली असल्याचे दिसून येते. याउलट सदर साक्षीदार हा त्याच्या घराच्या पूर्वेला जोंधळखिंडी वाळूज रस्ता वळण मारुन गावात जात असल्याचे तसेच घराच्या मावळतीला जगन्नाथ बाबर यांचे घर असल्याचे तसेच दक्षिणेला विठोबा बाबर यांचे घर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला हिंदूराव बाबर, हरीबा पवार, किसन देवकर यांची घरे असल्याचे, त्याचे घर रस्त्यावरुन घर दिसत असल्याचे रस्ता वर्दळीचे असल्याचे कबूल केले आहे. यावरुन अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे जर घटना दिवसा घडली असेल निश्चितच आजूबाजूचे लोकांनी पाहिली असती यावरुन अभियोग पक्षाच्या केसवरती शंका निर्माण होत आहे तसेच वर्दीदार हा त्याच्या घरापासून विटा अंतर १३ किमी असल्याचे, विटयाला येण्यासाठी सतत वाहने असल्याचे तसेच तथाकथीत घटनेवेळी त्याच्याकडे वाहन असल्याचे, त्याला चोरी झाल्याचे दुपारी चारला समजल्याचे व त्याने रात्री ९ ला वर्दी दिल्याचे मान्य केले आहे यावरुन देखील वर्दी द्यायला झालेल्या उशीराबद्दल अभियोग पक्षाचे कोठेही स्पष्टीकरण येत नाही. तसेच वर्दीदारकडे सोनेचांदीचे वस्तू असल्याचे मालकीचा पुरावा नसल्याचे व त्याने चोरीला गेलेला माल त्याच स्वरुपात मिळाला नसल्याचे कबूल केले असल्याने देखील अभियोग पक्षाच्या केसवरती शंका निर्माण होत आहे.

९. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला पंच साक्षीदार श्री.कुंडलीक बाबर (सा.क्रं.२) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता तो घटनास्थळाचा पंच साक्षीदार असून तो अभियोग पक्षाच्या कथनांना पुष्टी देतो. परंतु, त्याने त्याचे उलटतपासात ते ज्या घटनास्थळाचा पंचनामा करणेसाठी पंच साक्षीदार म्हणून गेले होते तेथील मिळकत नंबर ते सांगू शकत नसल्याचे कथन केले आहे. तसेच त्यांनी कोणत्या गुन्हा रजिस्टर नंबरमध्ये पंचनामा केला हे त्यांना सागता येत नसल्याचे देखील कथन केले आहे. यावरुन देखील सदर घटनास्थळ पंचनाम्याच्या सत्येतेवरती प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

१०. अभियोग पक्षातर्फे आरोपी विकास बाबर याने दिलेला निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा याकरीता तपासण्यात आलेले साक्षीदार मनसुर शेख (सा.क्रं.३), यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. तसेच आरोपी धनाजी घाडगे याने दिलेला निवेदन व जप्ती पंचनामा याकरीता तपासलेले साक्षीदार दस्तगीर शिकलगार (सा.क्रं.४),याने ही अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. तसेच आरोपी आनंदा आडके याने दिलेला निवेदन व जप्ती पंचनामा याकरीता तपासण्यात आलेले साक्षीदार सुनिल कांबळे (सा.क्रं.५) याने देखील अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. अभियोग पक्षातर्फे विशेष सहायक सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने सदर साक्षीदारांना उलटतपासात विचारले जावू शकणारे प्रश्न विचारले, परंतु त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काहीही सांगितले नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपींचे याकामी असलेले सर्व निवेदन व जप्ती पंचनामे शाबीत करु शकले नाही.

११. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार श्री.प्रमोद शिंत्रे (सा. क्रं.६) यांच्या जबाबाचे अवलोकन केले असता ते आरोपी आनंदा आडके व सत्यवान देशमुख यांना ओळखत असून आरोपी मुंबईमध्ये त्याचेकडे सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आले होते व सत्यवान याने आनंदा याचे घरी अडचण असल्याचे सांगून सोन्याचे गंठण व इतर सोन्याच्या वस्तू गाळणेसाठी त्याच्याकडे दिल्या असल्याचे कथन केले. त्याप्रमाणे त्याने सोन्याचे दागिणे गाळून सोन्याची लगड व चांदीचा पाटला तयार करुन दिला व त्याबदल्यात रु.१००/-

मजुरी घेतली असल्याचे कथन केले आहे. तसेच त्याने पुढे असेही कथन केले आहे की, ज्यावेळी विटा पोलीस त्याच्याकडे चौकशीसाठी आले त्यावेळी त्याला खरी घटना कळाली असल्याचे कथन केले आहे.

**१२.** परंतु, सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपासात तो आटणीचा व्यवसाय करीत असल्याचा कागदोपत्री पुरावा पोलीसांना दिला नसल्याचे, सोने गाळणेसाठी आल्यानंतर सोन्याची मालकी दाखविणाऱ्या पावत्या तपासल्या नसल्याचे व सोने गाळणी संदर्भात कोणताही लेखी दस्ताऐवज त्याने तयार केला नसल्याचे कथन केले आहे. तसेच, सदर आरोपी त्याच्याकडे किती तारखेला व किती वाजता सोने मोडायला आले होते हे त्याला सांगता येत नसल्याचे देखील कथन केले आहे. तसेच, त्याने पोलीसांना दिलेल्या जबाबाच्या तारखेबाबत भिन्नता दिसून येते. यावरुन सदर साक्षीदाराच्या सत्यतेवरती शंका निर्माण होत आहे.

**१३.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला तपासी अधिकारी श्री.ए.टी.पोळ (सा.क्रं.७) याच्या जबाबाचे अवलोकन केले असता त्याने त्याचे साक्षीत केलेल्या तपासाचे सविस्तर वर्णन करुन आरोपीचे निवेदन पंचनामेव्दारे सोने चांदीचे दागिणे जप्त केले असलेचे कथन केले आहे. तसेच, तपासाअंती आरोपींनी फिर्यादीचे घरामध्ये रोख रक्कमेची व सोन्या–चांदीच्या दागिण्यांची चोरी केली असल्याचे निष्पन्न झालेने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्याने त्याचे उलटतपासात याकामी अटक केलेला पंचनामा हजर केलेला नसल्याचे व दोषारोपपत्रासोबत मिळालेला मुद्देमाल सोन्याचा होता हे दाखविणारा सराफाचा दाखला देखील याकामी हजर केला नसल्याचे कथन केले आहे. यावरुन देखील तपासी अधिकारी यांच्या पुराव्यावर शंका निर्माण होत आहे.

**१४.** चोरीच्या गुन्हयामध्ये ज्यावेळी प्रत्यक्ष साक्षीदार उपस्थित नसतो अशावेळी आरोपी यांनी पोलिसांच्या ताब्यात असताना दिलेला निवेदन व जप्ती पंचनामा शाबीत होणे गरजेचे असते परंतु याकामी सर्व आरोपींनी दिलेले निवेदन व जप्ती पचनामे शाबीत करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नसल्याने त्यांचे जप्ती व निवेदन पंचनामे

याकामी केवळ तपासी अधिकाऱ्याच्या पुराव्यामध्ये निशाणी पडल्याने शाबीत झाले असे म्हणता येणार नाही. तसेच याकामामध्ये आरोपी यांनी वर्दीदारच्या घरातीत सोने व चांदीच्या वस्तू चोरल्या याबद्दलचा कोणताही विश्वासपात्र पुरावा अभिलेखावरती आलेला नाही. वरील बाबी व न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा विचारात घेतला असता आरोपींचा सदर गुन्ह्याशी कोणताही संबंध असल्याबाबत कोणताही विश्वासपात्र पुरावा अभियोग पक्ष न्यायालयीन अभिलेखावर सादर करु शकला नसल्याचे दिसून येते. आरोपीला गुन्ह्यात गोवण्यासाठी लागणारी साखळी पुर्ण करणेस अभियोग पक्षाला अपयश आले आहे. त्यामुळे अभियोग पक्षाने आणलेल्या पुराव्यावर विश्वास ठेवून आरोपींनी अभिकथीत गुन्हा केलेला आहे असे गृहीत धरुन त्यांना शिक्षा देता येणार नाही. फौजदारी खटल्यामध्ये अभियोग पक्षाने आपला खटला संशयापलीकडे सिध्द करणे आवश्यक असते व तसे करण्यास अभियोग पक्ष या खटल्यामध्ये असमर्थ ठरलेला आहे. सदर प्रकरणी आरोपी क्रं.३ हा फरारी असलेने आरोपी क्रं.१,२ व ४ यांचेविरुध्द नि.०१ अन्वये सदरची केस चालविणेत येवून आरोपी क्रं.३ विरुध्द सदरची केस सुप्त ठेवण्यात आली. सबब, जप्त मुद्देमालावर कोणताही आदेश करणे योग्य होणार नाही. वरील सर्व कारणास्तव मी विचाराधीन बाबी क्रं.१ व २ चे उत्तर नाकारार्थी नोंदवितो.

**<u>विचाराधीन बाबी क्रं.३ बाबत –</u>**

**१५.** विचाराधीन बाबी क्रं.१ व २ चा निष्कर्ष प्राप्तीनुसार भारतीय दंड विधान संहिता कलम ४५४,३८० सह कलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र अपराध आरोपींविरुध्द सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे सदर अपराधामधून आरोपी क्र. १,२ व ४ हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर कामी सदर खटला हा आरोपी क्र. १, २ व ४ यांच्याविरुध्द वेगळा करुन चालविण्यात आला होता त्यामुळे आरोपी क्र. ३ करीता सदर खटला हा प्रलंबित ठेवण्यात येतो. म्हणून विचाराधीन बाबी क्रं.३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## ***<u>आ दे श</u>***

१. आरोपी क्रं.१, २ व ४ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१)

अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम ४५४, ३८० सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून दोषमुक्त करण्यांत येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपी क्रं.३ विरुध्द सदर केस दि.२८.०४.२०१७ च्या आदेशाने सुप्त ठेवण्यात आली आहे.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५,०००/– वैयक्तीक बंधपत्राची पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

sd –/

दिनांक ०३/०५/२०१९ ( विकास सावता शिंदे)

विटा. प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, विटा.